## प्रेसनोट

जा.क्र.  ७९८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस उप अधिक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :— २/१२/२०१७

## " बालीका विनयभंग गुन्हयात आरोपीस एक वर्ष कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा"

पोलीस ठाणे लाखांदुर अंतर्गत ग्राम मोहरणा येथिल पिडित अल्पवयीन बालीका, वय ९ वर्ष, ४ महीने हिस गावातीलच आरोपी नामे कुशन शंकर मेश्राम, वय ५० वर्ष रा. मोहरणा याने पिडित अल्पवयीन बालीका बाजार चौकातुन आपले काकाकरीता खर्रा घेवुन परत जात असतांना पानठेल्याचे जवळ बसुन असलेला आरोपी याने पिडितेस आपणाकडे बोलावुन १५ रूपये देतो आपले 'गुप्त अंगावरील कपडे काढुन दाखव' असे म्हणुन पिडितेचा लैंगीक छळ केला, त्यावर पिडित बालीका हिने सदर कृत्य करण्यास नकार देवुन त्याठिकाणाहुन निघुन जावुन सदर हकीकत आपले आई—वडीलांना सांगीतली व घडलेल्या घटणेसंबंधी पोलीस ठाणे लाखांदुर येथे तोंडी तक्रार दिल्यावरून अप.क्र. ३९/१६ कलम ३५४ (अ) (४) (३) भादवि सहकलम १२ बाल लैंगीक अत्याचार संरक्षण अधिनीयम २०१२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक तिर्थराज निंबेकर, पो.स्टे. लाखांदुर यांनी सुरू केला. गुन्हयात आरोपीस अटक करून साक्षपुरावे गोळा केले आणि विशेष सत्र न्यायालय भंडारा येथे आरोपी विरूध्द आरोप पत्र दाखल केले. सदर आरोपपत्रास के.क्र. २९/१६ अन्यवे सत्र न्यायाधिश यांचे समक्ष सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी **मा. सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा.** यांचे समक्ष चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट दुर्गा तलमले, सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक २.१२.२०१७ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन आरोपी विरूध्द दोषसिध्द झाल्याने कलम १२ बाल

लैंगीक अत्याचार संरक्षण अधिनीयम २०१२ अन्वये एक वर्ष सश्रम कारावास व ३०००/- रूपये दंड, दंड न भरल्यास १ महिणा कारवासाची शिक्षा सुनावण्यात आली. सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक मंडलवार यांचे मार्गदर्शनात पो.हवा. सुरेश भलावी, ब.नं. ८६ यांनी पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

(एस.व्ही.कुलकर्णी)
पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी क्र.९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.